


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७७३. वा | गुरुवार दि. १६ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्हा रुग्णालयात भर उन्हाळ्यात नाही पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

# डीपीडीसीत आरओ मंजूर होऊनही अद्याप काम पूर्ण नाही...

## सा. बां. (विद्युत विभाग) चे अत्यंत ढिसाळ प्रयत्न...


**पोस्टमार्टम ८५**

**जिल्ह्यातील कंत्राटाना वगळून बाहेरच्या जिल्ह्यातील कंत्राटाना देत आहे प्रथम दर्जा (गोलमाल) अशी कशी आहे सार्वजनिक विद्युत विभाग बुलडाणा यांची ऊर्जा**

**जनसंचलन/बुलढाणा**


सध्या उन्हाळ्याचा ऋतू आपल्या ऐन भरात आहे. उन्हामुळे जिवाची लाहीलाही होण्याची स्थिती आहे. या स्थितीत येथील जिल्हा रुग्णालयात ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी शुद्ध व थंड पाण्याची सुविधा नसल्याने येथे येणाऱ्या लोकांच्या घशाला कोरड पडत असल्याचे दिसून येत आहे बुलडाणा कर्तव्यदक्ष जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयाची पहाणी केली असता उपचाराकरीता आलेल्या रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती बघून त्वरीत एक आरओ मंजूर करून देऊनही अनेक महिने लोटले, परंतु सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग अमरावती व बुलडाणा या कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या संतगतीने चालणारे कामकाज ढिसाळपणामुळे नागरिकांना नाहकचा त्रास सहन करावा लागतो आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचार आणि येथे माजलेली अनागोदी यावर सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करीत असतो. गेल्या अनेक भागांपासून आम्ही ही मोहीम सुरू केली आहे. परंतु या दरम्यान जिल्हा रुग्णालयात असलेल्या विविध समस्यांची देखील माहिती प्राप्त होत असते. जिल्हा रुग्णालय म्हटले की जिल्हाभरातून या ठिकाणी विविध प्रकारचे रुग्ण व त्यांचे नातेवाईक येत असतात. बऱ्याचदा रुग्णांना या ठिकाणी अनेक तास ताटकळावे लागते. जे रुग्ण भर्ती झालेले आहेत, त्यांच्या नातेवाईकांना काही दिवस येथे रहावे लागते. सध्या उन्हाने चांगलाच कहर केला आहे. गेल्या सुमारे दीड महिन्यांपासून उन्हाचा चटका सहन होईनासा झाला आहे. या स्थितीत दर अर्ध्या-एका तासाने घशाला कोरड पडते आणि पाणी पीत रहावे लागते. त्यामुळे जिल्हा रुग्णालयात पाण्याची योग्य ती व्यवस्था आवश्यक आहे. काही महिन्यांपूर्वी येथील गरज पाहून जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या बैठकीत जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या नागरिकांना पिण्याचे शुद्ध व थंड पाणी मिळावे, यासाठी एक आरओ मशीन मंजूर केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी ही प्रशासकीय मान्यता दि. २७ ऑक्टोबर २०२३ रोजीच दिलेली आहे. सुमारे ३३ लाख ८३ हजार रुपये खर्च करून नागरिकांना पाणी देण्यासाठी ही सुविधा येथे लवकरात लवकर होणे अपेक्षित होते. मात्र, आता तब्बल सहा महिन्यांपेक्षाही जास्त कालावधी उलटून देखील या ठिकाणी पाण्याचे आरओ बसवण्यात आलेले नाही. आपल्या अत्यंत ढिसाळ नियोजनासाठी आणि दिरंगाईपूर्ण कामासाठी अमरावती व बुलडाणा येथील सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग सर्वश्रुत आहे. या विभागाकडे कोणते काम गेले की, कधीच पूर्ण होत नाही ही स्थिती आहे. याचा अनुभव येथील जिल्हा रुग्णालयात फायर सेफ्टीच्या कामात आलेला आहे. महीनोन् महीने उलटून देखील या ठिकाणी फायर सेफ्टीचे काम योग्य पद्धतीने करण्यात आलेले नाही. आज जर जिल्हा रुग्णालयात आग लागली, तर ती आग विझवण्यासाठी येथे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. मागील काही वर्षांत राज्यभरात जिल्हा रुग्णालयांना आग लागून अनेकांनी आपला जीव गमावला आहे. तीच स्थिती बुलढाणा जिल्हा रुग्णालयात देखील उद्भवू शकते. जी स्थिती येथील फायर सेफ्टीची आहे, त्यापेक्षाही बदतर स्थिती ही पिण्याच्या पाण्याची आहे. या ठिकाणी येणारे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना रुग्णालयात पाणी नसल्याने विनाकारण पाणी विकत घ्यावे लागत आहे. यातून गोरगरीब नागरिकांना विनाकारण आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. बुलढाणा जिल्हा रुग्णालयात विकास काम करावयाचे असतानासुद्धा या कामाची प्रक्रिया ही सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग अमरावती व बुलडाणा या कार्यालयाकडून करण्यात येत आहे, व जिल्ह्यातील कंत्राटाना काम न देता हे काम बुलडाण्यापासून शेकडो किलोमीटर अंतरावर असलेल्या कंत्राटाना काम दिल्या जात असल्याची दाट शक्यता आहे. हे न समजण्यापलीकडचे आहे. बुलढाण्यातही हे काम चांगल्या प्रकारे होऊ शकते स्थानिक कंत्राटदार नेमला असता तर उन्हाळ्यापूर्वी जिल्हा रुग्णालयात आरओ यंत्रणा काही दिवसातच बसवणे शक्य झाले असते. परंतु सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग अमरावती व बुलडाणा या कार्यालयातील अत्यंत ढिसाळ आणि नालायक अधिकारी-कर्मचारी यांना या विषयाचे काहीही गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात विद्यमान जिल्हा शल्यचिकित्सकांनीही अमरावती व बुलडाणा कार्यालयाकडे पाठपुरावा केला, मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग काही केल्या सुधरायला तयार नाही. ही एकंदर स्थिती पाहता आता कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी पुन्हा एकदा या विषयावर योग्य तो पाठपुरावा करून जिल्हा रुग्णालयात तोंडावर आलेला पावसाळा परिस्थिती बघून उन्हाळा संपण्यापूर्वी तरी रुग्णांना व त्यांच्या नायवाईकांना पिण्याच्या पाण्याची योग्य ती व्यवस्था व्हावी, अशी अपेक्षा रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून व्यक्त होत आहे.

अजून बरेच काही पुढील भागात



### रुग्णसेवा ईश्वर सेवा...

**पिण्याच्या पाण्याविषयी आम्ही जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सुभाष चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी रुग्णाना व त्यांच्या नातेवाईकांना त्वरित तात्पुरती पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून दिली असून बुलडाणा नगर परिषद कडून आलेल्या पाण्याच्या पाईप लाईन मध्ये चॉकप असल्याने तेथून सामान्य रुग्णालय परिसरापर्यंत पूर्ण पाईप लाईन नवीन टाकण्याचे आदेश दिले व त्वरित काम ही सुरू झाले हे विशेष**




# शिंदे बाप-लेक भाजपात जाणार, प्रकाश आंबेडकरांचा दावा

**वृत्तसंस्था/सोलापूर**

राज्यातील लोकसभा निवडणूक ही शेवटच्या टप्प्यात पोहोचली असून राज्यात २० मे ला पाचव्या टप्प्यात म्हणजेच २०२४ ची शेवटची लोकसभा निवडणूक पार पडणार आहे. त्यामुळे सध्या राज्यातील मुंबई, नाशिक, धुळे, कल्याण, ठाणे या ठिकाणी प्रचाराचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.पण या सर्व उत्सहात आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे खळबळ उडाली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे आणि आमदार प्रणिती शिंदे ही बाप लेकीची जोडी भाजपात प्रवेश करणार आहे. असे प्रकाश आंबेडकर यांच्याकडून सांगण्यात आले आहे. मी औरंगजेबच्या कबरीवर जाऊन चादर चढवली आणि सांगितले आमच्यावर गुन्हा दाखल करून दाखवा. मुस्लिमांनो आता जर तुम्ही चूक केली तर तुम्हाला वाचवायला कोणी येणार नाही. जर या सरकारला पुन्हा आणले तर गल्लीगल्लीत पुन्हा गोध्रा आणि मणिपूर होईल. जर झाले तर तेव्हा काय काँग्रेस येणार का? गोध्रामध्ये तर काँग्रेस सहभागी होते असे समोर आले आहे, असा आरोपही यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी केला. तसेच, सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे हे भाजपात प्रवेश करतील. निवडणूक झाली की त्यांचा भाजपा प्रवेश होईल, असा दावा प्रकाश आंबेडकर यांच्याकडून करण्यात आला आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मतमोजणीचे कार्य जबाबदारीने पार पाडावे -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलडाणा**

लोकसभा निवडणूकीचा अंतिम टप्पा हा मतमोजणी हा आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये मतमोजणी ही संवेदनशील बाब आहे. त्यामुळे मतमोजणीमध्ये प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांना नेमून दिलेली कामे जबाबदारीने पार पाडाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज अधिकारी आणि कर्मचारी यांचे निवडणुकीच्या मतमोजणीबाबत प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, राजेंद्र पोळ, समाधान गायकवाड, जयश्री ठाकरे, अजिंक्य गोडगे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, डॉ. रामेश्वर पुरी, शैलेश काळे, संजय खडसे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, मतदार नोंदणी, त्याची पडताळणी, मतदान आणि मतमोजणी हे चार टप्पे निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाचे आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी मतदानापर्यंतची




प्रक्रिया पार पडली आहे. आता मतमोजणी हा अतिशय संवेदनशील टप्पा पार पाडवयाचा आहे. मतमोजणीसाठी नियुक्त कर्मचारी आणि अधिकारी यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत आहे. सर्व्हीस वोटर, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींचे पोस्टल मतदान आणि इव्हीएमवरील मतदान मोजण्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे. मतमोजणीची प्रक्रिया सुरळीत व्हावी, यासाठी सर्वांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी यांनी नेमून दिलेली कामे जबाबदारीने वेळेत पार पाडावी. मतमोजणीच्या दिवशी वेळेत उपस्थित राहणे गरजेचे आहे. ओळखपत्राशिवाय कुणालाही प्रवेश दिला जाणार नाही, तसेच मतमोजणीच्या ठिकाणी मोबाईल नेता येणार नसल्याने कर्मचाऱ्यांनी याबाबतच्या निर्देशाचे पालन करावे. मतमोजणीचे कार्य अत्यंत संवेदनशील असल्याने कर्मचाऱ्यांनी पूर्ण वेळ सजगतेने कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले. यावेळी डॉ. पुरी आणि श्री. पाटील यांनी कर्मचाऱ्यांना मतमोजणीबाबत प्रशिक्षण दिले.

# मेहकरात नृसिंह नवरात्रोत्सवास प्रारंभ

**जनसंचलन/मेहकर**

येथील प्राचीन नरसिंह संस्थानमध्ये १३ मे रोजी सद्गुरू ॲड. रंगनाथ महाराज पितळे यांच्या अधिपत्याखाली नृसिंह नवरात्रोत्सवाचा विधिवत प्रारंभ करण्यात आला. या उत्सवाचे हे ४५५ वे वर्षे आहे. संस्थानचे अध्यक्ष व पीठाधीश ॲड. रंगनाथ महाराज पितळे यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात कलशस्थापना करण्यात आली. संस्थानचे विश्वस्त आशिष उमाळकर, डॉ. अभय कोठारी, विठ्ठल खंदारकर यांच्या हस्ते द्वारपूजन व ध्वजपूजन करण्यात आले. वेदमूर्ती वरुणशास्त्री सराफ यांनी पौरोहित्य केले. १३ मे ते २३ मे या कालावधीत संस्थानमध्ये भजन, कीर्तन, महाभिषेक, हरिपाठ, महाआरती, पुराणपठण, अक्षतार्पण काकडा शेजारती. काला.महाप्रसाद आदी भरगच्च कार्यक्रम साजरे होणार आहेत. परंपरेप्रमाणे गोपाल पितळे हे पुराणपठण व डॉ. श्रीहरी पितळे हे अक्षतार्पण करणार आहेत. दरम्यान, भाविकांचे आकर्षण असलेल्या श्रीमूर्तीच्या दररोजच्या नयनरम्य पोशाखांना सुरुवात झाली आहे. प्रथेप्रमाणे श्रीमूर्तीला दररोज वारदेवतेच्या पोशाखाने सजविण्यात येत असते.

# गुटखा विक्री करणाऱ्यास पकडले

**जनसंचलन/खामगाव**

शहरातील बर्डे प्लॉट भागातील एका इसमाला गुटखा विक्री करणार्यास रंगेहात पकडण्यात आले. त्याच्या जवळून २४ हजार रूपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. ही कारवाई सोमवारी रात्री साडे आठवाजता दरम्यान करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार, बर्डे प्लॉट भागातील शेख अफसर शेख बुढन (४८) याच्या जवळून एएसपी अशोक थोरात यांच्या पथकातील वाचक फौजदार मनोज वसाडे यांनी गुप्त माहितीच्या आधारे छापा मारून उपरोक्त इसमाकडून




पान मसाला, तंबाखूजन्य पुड्या, सुगंधीत तंबाखू, केसयुक्त पान मसाला यासह इतर प्रकारच्या २४ हजार रूपये किंमतीच्या गुटख्याच्या २०० नग पुडी जप्त केल्या. मनोज वसाडे यांच्या तक्रारीवरून संशयित शेख अफसर शेख बुढन विरोधात गुन्हा दाखल झाला.

# शुल्लक कारणावरून वाद घालत केली मारहाण

**जनसंचलन/ जळगाव जा**

शुल्लक कारणावरून वाद घालत मारहाण केल्याची घटना जळगाव जामोद तालुक्यातील गोळेगाव हुरसाळ येथे १२ मे रोजी रात्री ८:३० वाजेच्या सुमारास घडली आहे. सविस्तर वृत्त असे की तक्रारदार अमोल अंबादास घुळे यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरून तक्रारदार यांच्या शेताजवळ राजू देविदास हुरसाळ यांचे शेत असून मागील आठ दिवसापूर्वी राजू देवदास हुरसाळ याने शेतातील डीपी वरील फ्युज तुझ्यामुळे जळतात तू डीपीची काळजी घेत नाही असे म्हणून तक्रारदार यांच्यासोबत वाद केला तेव्हा तक्रारदार यांनी त्यास म्हटले होते की मी काही केले नाही तू मला काही बोलू नको असे म्हटले होते त्यावर आरोपी यांनी तुला एखाद्या दिवशी दाखवीतो अशी धमकी सुद्धा दिली होती. त्यावरून १२ मे रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास तक्रारदार हे मोटरसायकलने शेतातून घरी जात



असताना राजू देवदास हुरसाळ यांचे घरासमोरून जात असताना राजू देवदास हुरसाळ व संतोष देविदास हुरसाळ हे दोघे जवळ येऊन तक्रारदार यांच्याशी वाद घालत होते वाद सुरू असताना संतोष याने त्याच्या हातातील लोखंडी पाईप तक्रारदार यांच्या कपाळावर मारले व राजू याने हातातील कुराड फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केले. डोक्याला गंभीर मार लागून रक्त अवस्थेत जखमी केले तेवढ्या तक्रारदार यांचा चुलत भाऊ भागवत हा त्या ठिकाणी आला व त्याने त्यांच्या तावडीतून सोडवून तक्रारदार यांना पोलीस स्टेशनला आणले व आरोपी विरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी फिर्यादी यांच्या तक्रारीवरून आरोपी राजू देवदास हुरसाळ व संतोष देवदास हुरसाळ यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे

# दे. कुंडपाळ येथे खरीपपूर्व हंगाम सभा...

**जनसंचलन/ देऊळगाव कुंडपाळ**

कुंडपाळ येथे खरीप पूर्व हंगाम सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी कृषी सहाय्यक आर. बी. सिरसाठ यांनी खरीप पूर्व हंगामाची शेतकऱ्यांना तयारी करण्याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये जमीन तयार करणे पासून ते पेरणीपर्यंतची सर्व कामे शेतकऱ्यांना समजावून सांगितले. सोयाबीन बियाण्याची प्रतवारी करणे, उगवण क्षमता तपासून पाहणे, बीज प्रक्रिया करणे, वाणाची निवड, पेरणीची खोली, पेरणीची पद्धत, खत व्यवस्थापन, तन व्यवस्थापन आदी माहिती देण्यात आली. सभेचे प्रास्ताविक कृषी सहायक शिवशंकर कुटे यांनी केले. तसेच हुमणी अळी नियंत्रण विषयी मार्गदर्शन करण्यात आले, व



महाडीबीटीवरील शेतकऱ्यांना अर्ज करण्यासाठी सांगण्यात आले. यामध्ये यांत्रिकीकरण, सिंचन सुविधा, बीबियाणे यासाठी सी. एस. सी. सेंटरवर अर्ज करून लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले. यावेळी कृषी सहायक जगन्नाथ जायभाये यांनी शेतकऱ्यांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# शेगाव जवाहर नवोदय विद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

**जनसंचलन/बुलडाणा**

इयत्ता दहावी व बारावीच्या केंद्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षा बोर्ड (सीबीएसई) परीक्षेत पीएम श्री स्कूल, जवहर नवोदय विद्यालय, शेगावने उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता बारावी विज्ञान शाखेमधून ३७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यात प्रथम स्थान ओम जयवाल ९१.६० टक्के, द्वितीय आदित्य दांडगे ८६.४० टक्के, तृतीय रोहिनी इखारे ८५.६० टक्के प्राप्त केले. इयत्ता बारावी कला शाखेतून २१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यात प्रथम शरयू शांताराम पाटील ९४.८० टक्के, द्वितीय श्रद्धा क्षीरसागर ९१ टक्के, तृतीय पुजा मुन ८५.८० टक्के प्राप्त केले. इयत्ता दहावी मधून ७८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. प्रथम पीयूष खडके ९८ टक्के, द्वितीय समीक्षा धुरंधर ९४.६० टक्के, श्रद्धा मांटे ९४.६० टक्के, तृतीय कुणाल किन्होळकर ९३.८० टक्के गुण मिळविले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य आर. आर. कसर, तसेच शिक्षक व शिक्षकेतर, कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# रस्त्यावर पडलेल्या वाळूमुळे दुचाकी स्वाराचा अपघात,शेतकऱ्यांनी स्वताच्या हाताने केली रस्त्याची सफाई

**जनसंचलन/सिंदखेडराजा**



रात्रीच्यावेळी सुसाट वेगाने धावणाऱ्या वाळू वाहतूकीमुळे मलकापूर पांग्रा ते साखरखेर्डा यासह अनेक रस्त्यावर वाळू पसरली असून वाळूच्या बारीक कणावर मोटारसायकल चालविणे कठीण झाले आहे. यातच अनेक अपघात होत असून अशीच घटना आज गोरेगाव ते पांग्रीकाटे रस्त्यावर घडली.त्या अपघातात दोन जखमी झाले आहेत. सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा ,गोरेगाव ते पांगरीकाटे या रोडवर अनेक गतिरोधक आहेत काही आवश्यक आहेत. परंतु या गतिरोधक वर रंगीत पट्टे न मारल्यामुळे अनेक वाहनधारकांना याचा पत्ता लागत नाही . रात्री ११ वाजेनंतर खडकपुर्णा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून वाळू वाहतूक करणारे टिप्पर सुसाट वेगाने धावतात . डिग्रस येथून ही वाहने ,वाकद , डोरव्ही , मलकापूर पांग्रा, शेंदुर्जन, या मार्गे साखरखेर्डा तर दुसरा मार्ग सावखेडनागरे, मेरा बु . देरगाव येथून शेंदुर्जन, तिसरा मार्ग मेरा बु, शिंदी , साखरखेर्डा , लव्हाळा असा हा वाहतुकीचा मार्ग आहे. साखरखेर्डा येथून ठराविक एजंट मार्फत वाळू पुरविल्या जाते . ही वाहतूक सुरु असताना त्या वाहनातील रेती सडा पडावा अशी पडलेली असते . गतिरोधकावरुन सुसाट वेगाने वाहन जात असताना मोठ्या प्रमाणात रेती खाली पडते .अशा ठिकाणी मोटारसायकल चालकांना अंदाज येत नसल्याने रेतीवरुन वाहन घसरुन अपघात घडत आहेत . १४ मे रोजी गोरेगाव फाट्यावर आणि गोरेगाव ते काटेपांग्री रस्त्यावर अपघात झाल्याने एक महिला व पुरुष जखमी झाले . शेतकरी भिकाजी पंचाळ यांनी लागलीच दोघांना दवाखान्यात पाठवून रस्त्यावरील रेती बाजूला केली . ज्या ठिकाणी गतीरोधक आहेत त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाने पांढरे पट्टे मारुन अपघाताची मालिका थांबवावी अशी मागणी ग्रामस्थ लोक करित आहे.

# पीक प्रात्यक्षिके,प्रमाणित बियाण्यांसाठी अर्ज घेण्यास सुरवात

**जनसंचलन/बुलढाणा**

महाडीबीटी पोर्टलद्वारे शेतकऱ्यांकडून पीक प्रात्यक्षिके आणि प्रमाणित बियाण्यांसाठी अर्ज घेण्यास सुरवात झाली आहे. याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सन २०२४-२५ मध्ये अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके, नगदी पिके कापूस व राष्ट्रीय खाद्य तेल अभियान गळीतधान्य अंतर्गत खरीप हंगामामध्ये प्रमाणित बियाणे वितरण, पीक प्रात्यक्षिके बाबींसाठी इच्छुक शेतकऱ्यांचे महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. पीक प्रात्याक्षिके वैयक्तिक शेतकरी, गटामार्फत राबविली जाणार असल्याने पीक प्रात्यक्षिकांसाठी अर्ज करताना संबंधित कृषि सहाय्यकांशी संपर्क करून नोंदणी करावी लागणार आहे. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके, नगदी पिके कापूस व राष्ट्रीय खाद्य तेल अभियान गळीत धान्य कार्यक्रम जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येतो. यात कडधान्य पिकामध्ये तूर, मुंग, उडीद, सोयाबीन अधिक तूर, भरडधान्य पिकात मका, पौष्टिक तृणधान्यात खरीप ज्वारी, गळीत धान्य व तेलताडामध्ये सोयाबीन, भुईमूग, तीळ, व्यापारी पिकात कापूस यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांची निवड महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन लॉटरी पद्धतीने होणार आहे. शेतकऱ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावे, असे आवहन करण्यात आले आहे.

# चिखली, देऊळगाव राजा येथील वसतीगृहातील प्रवेश प्रक्रियेस सुरवात...

**जनसंचलन/बुलडाणा**

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अधिनस्त वसतीगृह मागास व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, चिखली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह देऊळगाव राजा येथील वसतीगृहातील शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मागासवर्गीय प्रवर्ग निहाय आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, जमाती, आर्थिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या तसेच इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग, अनाथ आदी प्रवर्गातील विद्यार्थी प्रवेशास पात्र राहणार आहेत. शालेय, कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयीन, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता चिखली व देऊळगाव राजा येथील नगरपालिकेच्या हद्दीतील शाळा, विद्यालय, महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रथम व द्वितीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थी प्रवेश अर्ज भरण्यास पात्र आहेत. प्रवेश अर्ज करण्याची अंतिम दि. १८ मे २०२४ असून प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची पहिली यादी दि. २५ मे रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरावेत. असे आवाहन चिखली वसतिगृहाचे गृहपाल पी. टी. राठोड भ्रमनध्वनी क्रमांक ९५०३२२८९८२ आणि देऊळगाव राजा वसतिगृहाचे गृहपाल व्ही. आर. सोनवाल भ्रमनध्वनी क्रमांक ९९२१८३१२७७ यांनी केले आहे. आधिक माहिती करिता भ्रमनध्वनिवर संपर्क साधावा किंवा प्रत्यक्ष वसतिगृहाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शेळी, कुक्कुट, गाय, म्हैस पशुपालन प्रशिक्षणाचे आयोजन...

**जनसंचलन/बुलढाणा**





महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे शेळी, कुक्कुट, गाय आणि म्हैस पालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राद्वारा जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींसाठी बुलडाणा येथे शेळी, कुक्कट, गाय, म्हैस पालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. २१ ते २५ मे २०२४ या पाच दिवसाच्या कालावधीत करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश सुशिक्षित बेरोजगारांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. सदर प्रशिक्षणात शेळी, कुकुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र आणि प्रकार त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन रोग व लक्षणे, खाद्यनिर्मिती व चार्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य त्यासोबतच उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, सहकार्य, शासकीय योजनांचीमाहितीआदीप्रशिक्षणातमार्गदर्शनतज्ज्ञव्यक्तीकरणारआहे. प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार किमान पाचवी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिले जाईल, प्रशिक्षण नोंदणीसाठी दि. २१ मे २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता, प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालयाजवळ, चिखली रोड, बुलडाणा संपर्क क्रमांक ८२७५०९३२०१, ९०११५७८५४ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय अधिकारी प्रदीप इंगळे यांनी केले आहे.

# मुंबईत ठाकरेंशी सामना, शिंदेंनी शिलेदार लावले कामाला त्रिमूर्ती सक्रिय, मुसंडी मारणार?

**वृत्तसंस्था/मुंबई**

उद्धव ठाकरेंना त्यांचंच होमग्राऊंड असलेल्या मुंबईत शह देण्याची तयारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सुरु केली आहे. मिशन मुंबईसाठी शिंदेंनी त्यांच्या तीन सहकाऱ्यांवर महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. महायुतीच्या जागावाटपात शिंद-सेनेला तीन जागा मिळाल्या आहेत. या जागा जिंकण्यासाठी शिंदेंनी त्रिमूर्तीला कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. मुंबईतील ६ जागांवर २० मे रोजी मतदान होईल. मुंबई शहरात कोकणी मतदारांचं प्रमाण लक्षणीय आहे. यासोबतच मूळचे पश्चिम महाराष्ट्रातील असलेले लाखो लोक मुंबईत वास्तव्यास आहेत. त्यामुळे शिंदेंनी त्यांच्या तीन मंत्र्यांना सक्रिय केलं आहे. तातडीनं कामाला लागा, असे आदेश शिंदेंनी दिले आहेत. मंत्री उदय सामंत, दीपक केसरकर, शंभुराज देसाई यांच्याकडे मिशन मुंबईची जबाबदारी देण्यात आली आहे. चौकसभा, मॅन टू मार्किंग करण्याचं काम त्यांच्याकडे देण्यात आलं आहे.चौथ्या टप्प्यातील मतदान संपल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मुंबईकडे विशेष लक्ष केंद्रीत केलं आहे. पक्षफुटीनंतर उद्धव ठाकरे यांच्याबद्दल जनमानसात सहानुभूती असल्याचं बोललं जातं. त्यातच मुंबई आणि ठाकरे कुटुंब यांचं वेगळं नातं आहे. शिवसेनेत आजही ठाकरेंची ताकद आहे. पक्ष संघटनेचं जाळं त्यांच्याकडे आहे. त्यामुळेच शिंदेंनी मुंबईची मोहीम फत्ते करण्यासाठी तीन विश्वासू शिलेदारांची निवड केली आहे.उदय सामंत रत्नागिरीतून निवडून येतात. ते तिथून सलग चारवेळा विजयी झाले आहेत. तर दीपक केसरकर सिंधुदुर्गमधील सावंतवाडीतून तीनवेळा निवडून आले आहेत. शंभुराज देसाई साताऱ्याच्या पाटणमधून तीनदा आमदार झाले आहेत. मुंबईत राहणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील आणि कोकणी लोकसंख्येचं प्रमाण पाहता तीन मंत्र्यांकडे मुंबईची जबाबदारी असेल. याशिवाय ठाण्यातील काही विश्वासू नगरसेवकांकडेही मुंबईवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.मुंबई दक्षिण मध्य, मुंबई उत्तर पश्चिम आणि मुंबई दक्षिण अशा ३ मतदारसंघात शिंदेसेनेनं उमेदवार दिले आहेत. दक्षिण मध्यमधून विद्यमान खासदार राहुल शेवाळे, उत्तर पश्चिममधून रविंद्र वायकर, दक्षिणमधून यामिनी जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. गेल्या निवडणुकीत शिवसेनेनं मुंबईतील तीनपैकी तीन जागा जिंकल्या होत्या. पैकी दोन खासदारांनी बंडानंतर शिंदेंना साथ दिली. मुंबईतील तिन्ही जागांवर शिंदेंसेनेचा मुकाबला ठाकरेसेनेशी होईल.



## घाटकोपर येथील होल्डिंग अपघातानंतर बुलढण्यातील नगर प्रशासणं आले एक्शन मोडवर...

### बुलढाणा शहरातील बेकायदेशीर लावलेल्या होल्डिंग काढल्या...





**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरातील होल्डिंग काढण्यास नगरपालिकेने मोहीम सुरू केली आहे. विविध गंभीर स्वरूपाच्या घटना यासमोर येत आहे यामध्ये मुंबईत वादळी पावसामुळे होल्डिंग पडून जवळपास १५ जणांचा मृत्यू झाला होता हे गंभीर स्वरूपाची धक्कादायक घटना समोर आली होती. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार बुलढाणा शहरातील अनधिकृत होल्डिंग फलक काढण्यास नगरपालिकेने सुरुवात केली आहे स्वतः नगरपरिषद चे मुख्याधिकारी श्री गणेश पांडे यांच्या उपस्थितीमध्ये सर्क्युलर रोडवरील फलक हटवण्यात सुरुवात झाली आहे. या अगोदर सुध्दा मोठी दुर्घटन घटना घडली आहे. पुणे शहरात ट्रफिक सिंगनल जवळ असलेले होल्डिंग खाली कोसळले सिंगनल खाली उभे असलेल्या लोकांच्या अंगावर हे होल्डिंग कोसळले आहे. यामध्ये काही लोकांचा जिव गेला आहे. असाच परत एक प्रकार आता मुंबई शहरात समोर आला आहे.मुंबईत वादळाच्या तडाख्यात सोमवारी होल्डिंग पडून मोठी गंभीर दुर्घटना घडली होती या घटनेत जवळपास १५ जणांचा मृत्यू झाला तर जखमींची संख्या सुद्धा जास्त आहे त्याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी होल्डिंगचे स्ट्रक्चर ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन यांनी जिल्ह्यातील तेरा तहसीलदार अकरा नगरपालिका व दोन नगरपंचायतीच्या मुख्य अधिकाऱ्यांना पत्र दिले होते. बुलढाणा शहरात मोठ्या प्रमाणात होल्डिंग दिसून येत आहे. जागोजागी कानाकोपऱ्यात होल्डिंग दिसून येत आहे त्यामुळे अशी गंभीर स्वरूपाची घटना होऊ नये यासाठी नगरपरिषदने आपली मोहीम सुरू केली आहे. त्यामुळे आज सकाळपासून होल्डिंग काढण्यात येत आहे.बुलढण्यातील छोट्या जागेत बिना परवानगी होल्डिंग लावले जात आहे हे नागरिकाच्या धोक्याचे असल्याने ते होल्डिंग स्ट्रक्चर जेव्हाही पडू शकते, चौका चौकात मिळेल त्या जागेवर बेकायदेशी स्ट्रक्चर उभे करून त्यावर मोठमोठे होल्डिंग लावण्याचे काम जोमात सुरु आहे .. नुकत्याच घडलेल्या अपघातानंतर बुलढाणा नगरपालिकेने या बेकायदेशीर होल्डिंग स्टॅक्चर कडे लक्ष केंद्रित केले असून अश्या होलण्डिंग स्ट्रकचाचे ऑडिड करण्याचे आदेश देण्यात आले असून नोटीसा सोडल्या होत्या मात्र आता होल्डिंग काढण्यात येत आहे. तसेच शहरातील काही भागातील अतिक्रमन सुध्दा काढण्यात येत आहे

## जिल्ह्यातील एकमेव स्त्री रुग्णाल्यात कर्मचारी अभावी आरोग्य व्यवस्था कोलमोडली...

### रिक्त जागा तातडीने भरण्याची कर्मचाऱ्यांची मागणी



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील एकमेव सुसज्ज अस जिल्हा स्त्री रुग्णालय मागील वर्षी पासून रुग्ण सेवेत दाखल झाले आहे.. फक्त महिलासाठी असलेले हे रुग्णालंय आता अपुरे कर्मचारी मुळे चर्चेत आले आहे भव्य अस या रुग्णाल्यात केवळ १७ नर्सेस व इतर कर्मचारी कार्यरत आहेत त्यात कायम फक्त ६ नर्सेस असून बाकी कंत्राटी आहेत .. वास्तविक ४८ रिक्त जागा भरणे करणे आवश्यक असताना १७ कर्मच्याऱ्या भरवश्यावर रुग्णालंय सुरु आहे व रुग्णाची संख्या फुल होत आहे दररोज २५ महिला रुग्णाची प्रसूती केल्या जात आहे वर्षाला ४ हजार पेक्षा जास्त प्रसूती होतात या १७ महिला नर्सेस वर ताण पडत आहे त्यामुळे येथील आरोग्य व्यवस्था कोलमोडली आहे.. तसेच वैध्यकीय अधिकऱ्यांची सुद्धा कमतरता आहे, केवक ६ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत २५ ते ३० वैद्यकीय अधिकारी असणे गरजेचे आहे मात्र त्यांच्या जागा सुद्धा रिक्त आहेत.. याबाबत आरोग्य विभागाच्या वरिष्ठांना कित्येक वेळा पत्र व्यवहार केला आहे मात्र त्याचा उपयोग झाला नाही आता तातडीने रिक्त जागा भरण्याची मागणी खुद येथील स्टाफ नर्स यांनी केली आहे